परीक्षा केंद्र परिसरातील झेरॉक्स केंद्रे बंद

कॉपीमुक्त मोहिमेसाठी राज्य मंडळ सज्ज

ड्रोन कॅमेऱ्याद्वारे देखरेख

- संवेदनशील व उपद्रवी म्हणून ओळखल्या गेलेल्या परीक्षा केंद्रांवर विशेष लक्ष ठेवण्यात येणार असून त्या ठिकाणी सीसीटीव्ही चित्रिकरणासह ड्रोन कॅमेऱ्याद्वारे देखरेख केली जाईल.
- प्रश्नपत्रिका वाहतूक व उत्तरपत्रिका संकलनासाठी शासकीय वाहने उपलब्ध करून देणे, तसेच पोलीस बंदोबस्त देणे बंधनकारक .
- भरारी पथके आणि बैठी पथके नियुक्त करून परीक्षा केंद्रांची अचानक तपासणी केली जाईल.

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : बारावीच्या परीक्षा मंगळवारपासून सुरू होते आहेत. या परीक्षा शांत, तणावमुक्त आणि कॉपीमुक्त वातावरणात पार पडाव्यात यासाठी राज्य प्रशासनाने कडक उपाययोजना करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याअंतर्गत परीक्षा कालावधीत प्रत्येक परीक्षा केंद्राभोवती ५०० मीटर परिसरातील सर्व झेरॉक्स केंद्रे बंद ठेवण्याचे निर्देश राज्य मंडळाने दिले आहेत. प्रश्नपत्रिका गळती, कॉपी साहित्य पुरवठा किंवा इतर गैरप्रकारांना आळा बसावा हा या निर्णयामागील मुख्य उद्देश आहे.

बारावी व दहावीच्या परीक्षा पारदर्शक, कॉपीमुक्त व निकोप वातावरणात पार पडाव्यात यासाठी राज्यस्तरावर समन्वय, नियंत्रण व प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य मंडळाकडून स्वतंत्र शिक्षण आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र राज्यस्तरीय दक्षता समिती स्थापन करण्यात आली आहे. जिल्हास्तरीय दक्षता समित्यांना या मोहिमेची जबाबदारी देण्यात आली आहे. समितीमध्ये सर्व परिक्षेत्रातील विशेष पोलीस महानिरीक्षकांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे पोलिसांच्या मदतीने ही झेरॉक्स केंद्रे बंद ठेवण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात यईल. जिल्हाधिकाऱ्यांचा अध्यक्षतेखाली कार्यरत समित्या केंद्रांवर आवश्यक नियोजन करणार आहेत.

कराड तालुक्यात ६९.३४ टक्के मतदान

मतयंत्रात बिघाड, पैसे वाटपावरून वाद

लोकसत्ता वार्ताहर

कराड : जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी शनिवारी कराड तालुक्यात ६९.३४ टक्के मतदान झाले. काही ठिकाणी मतदान यंत्रांमध्ये तांत्रिक अडचणी, तर काही भागांत पैसे वाटप व मतदार नेण्यावरून वादाचे प्रसंग घडले; मात्र पोलिस व प्रशासनाच्या सतर्कतेमुळे परिस्थिती नियंत्रणात राहिली.

सकाळी मतदानास सुरुवात होताच चचेगाव व जखिणवाडी येथील मतदान केंद्रांवरील यंत्रे सुरू होण्यास अडचण आली. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनानंतर काही वेळातच ही यंत्रे कार्यान्वित करण्यात आली. घोडेवाडी येथील केंद्रावर एका यंत्राचे बटण कार्यरत नसल्याने तातडीची देखभाल करून मतदान पुन्हा सुरू करण्यात आले.

दरम्यान, विंग, विरवडे, शेरे (थोरातमळा), रेठरे बुद्रुक व कोळे येथील केंद्रांवर यंत्रांमध्ये तांत्रिक बिघाड आढळून आल्याने ती यंत्रे बदलण्यात आली. विशेष म्हणजे विंग येथील एका केंद्रावर दोन वेळा यंत्र बदलावे लागले.

अनेक उमेदवारांनी पायाला धावाधाव करून गट-गणातील गावोगावी मतदान केंद्रांना भेटी दिल्या. पुणे व मुंबई येथे वास्तव्यास असलेल्या चाकरमान्यांनी खास मतदानासाठी गाव गाठल्याने मतदानातील उत्साह अधिकच वाढला होता.

वारूंजीत पैसे वाटपावरून वादावादी

वारूंजी येथील जिजामातानगर परिसरात एका पक्षाचे कार्यकर्ते पैसे वाटप करत असल्याचा प्रकार उघडकीस आला. विरोधी गटाच्या कार्यकर्त्यांनी त्यांना रंगेहाथ पकडत जाब विचारला, त्यानंतर दोन्ही गटांत वाद होऊन मारहाणीचा प्रकार घडला. या घटनेचा चलचित्र समाज माध्यमांवर प्रदर्शित होत असून, संबंधित कार्यकर्त्यांवरूद्ध पैसे व मतदारांच्या नावांची यादी असल्याचे त्यात स्पष्टपणे दिसत आहे.

राजकीयदृष्ट्या संवेदनशील मानल्या जाणाऱ्या वडगाव हवेली येथे मतदान केंद्रावर एका वृद्ध महिलेला मतदानासाठी घेऊन जाताना दोन गटांत तणाव निर्माण झाला. मात्र पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप केल्याने संभाव्य अनुचित प्रकार टळला आणि परिस्थिती निवळली.

कोल्हापुरात मतटक्क्यात वाढ; ईव्हीएम मशीन फोडल्याने गोंधळ

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

कोल्हापूर : मतदान केंद्रावर सकाळपासून लागलेल्या रांगा, ईव्हीएम मशीनची तोडफोड, वादावादीचे प्रकार, लाडक्या बहिणींचा परिणाम अशा वातावरणात कोल्हापूर जिल्ह्यात शनिवारी जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी उत्साहात मतदान पार पडले. लक्ष्मी दर्शनाचा परिणाम म्हणून मतदानाची वेळ सायंकाळी साडेपाच वाजता संपली तरी रात्री उशिरापर्यंत मतदान होतच राहिले. गत वेळेपेक्षा मतदानाचा आकडा ओलांडला गेला. जिल्हा परिषदेवर सत्ता कोणाची याचा निर्णय मात्र सोमवारी मतमोजणी वेळी स्पष्ट होणार आहे.

जिल्हा परिषदेच्या ६८ गटासाठी, पंचायत समितीच्या १३६ गणासाठी शनिवारी सकाळी मतदानाला सुरुवात झाली. ग्रामीण भागात सकाळी कामांची धांदल उडालेली असते. हे काम लवकर आवरून मतदार सकाळपासूनच केंद्रावर मतदार पोहोचले होते. त्यामुळे अनेक केंद्रांवर मतदारांची गर्दी दिसत होती. अर्थात याला निवडणुकीतील चुरशीची किनार होती.

मंत्र्यांचे मतदान

ग्रामीण भागात मतदान असलेले पालकमंत्री प्रकाश आबिटकर, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ या मंत्र्यांसह काही आमदारांनी मताधिकार बजावला.

राज्याचे आरोग्य तथा पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी गारगोटीत मतदान केले.

सुरूपली येथे धनश्री व श्रावण पाटील या नवपरिणीत जोडप्याने मतदानाचा हक्क बजावला.

भर दुपारी मतदान

दुपारी दीड वाजेपर्यंत मिळालेल्या आकडेवारीनुसार जिल्ह्यातील एकूण २ हजार ६९१ मतदान केंद्रांवर ४३.९५ टक्के मतदानाची नोंद झाली आहे. जिल्ह्यातील २३ लाख ४० हजार मतदारांपैकी ५ लाख २२ हजार पुरुष मतदार, ५ लाख ५ हजार स्त्री मतदार तसेच इतर ९ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. पुढील दीड तासात १३ लाख ७६ हजार मतदारांनी मतदान केल्याने भर दुपारी मतदारात उत्साह असल्याचे दिसून आले.

संध्याकाळनंतर गर्दी

गावगाड्यातील काहींनी संध्याकाळनंतर मतदान करण्याची भूमिका घेतली. सायंकाळी साडेपाच पूर्वी आलेल्या मतदारांच्या रांगा बऱ्याच केंद्रांमध्ये राहिल्या होत्या. त्यामुळे मतदानाची एकूण मतदानाची अधिकृत आकडेवारी समजण्यास विलंब होत होता.

ईव्हीएम मशीन फोडले

भुदरगड तालुक्यातील नाधवडे येथे जयवंत वायदंडे या मतदाराने मतदान केल्यानंतर तेथील ईव्हीएम मशीन जमिनीवर आपटले. मतदान यंत्र बंद पडल्याने केंद्रात एकच गोंधळ उडाला. मतदान पत्रिकेवर घेण्यात यावी, या मागणीसाठी आपण हे कृत्य केल्याचे वायदंडे यांनी अधिकाऱ्यांना सांगितले. या प्रकरणी त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उसाच्या ट्रॉलीला ट्रकची धडक; दोन जण जखमी

लोकसत्ता प्रतिनिधी

सातारा : सातारा शहरात पुणे - बंगळूर महामार्गावर पोवई नाका येथे रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास उसाने भरलेल्या ट्रॉलीला पाठीमागून भरधाव ट्रकने धडक दिल्याने अपघात घडला. या धडकेत ट्रक तसेच उसाची ट्रॉली यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. ही धडक इतकी मोठी होती की, ट्रॉलीतील ऊस रस्त्यावर विखुरला गेला. अपघातात दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना मदत करून उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले.

दरम्यान, या घटनेची नोंद उशिरापर्यंत सातारा शहर पोलीस ठाण्यात झालेली नव्हती. अपघातामुळे काही वेळ वाहतुकीस अडथळा निर्माण झाला होता. वाहतूक सेवा रस्त्याने वळवली होती.

सातारा शहरात पुणे - बंगळूर महामार्गावर पोवई नाका येथे ट्रक तसेच उसाच्या ट्रॉलीच्या धडकेत ट्रॉलीतील ऊस रस्त्यावर विखुरला.

शतकपार वयोवृद्धांची मतदानासाठी पायपीट

कोल्हापूर : एकीकडे मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी राज्यातील प्रशासनाची भाषा असली तरी प्रत्यक्षात मतदारांसाठी सुविधा राबवताना काही बाबतीत दुजाभाव असल्याचे दिसत आहे. लोकसभा, विधानसभा निवडणुकी वेळी ८५ वर्षांवरील वृद्धांना घरबसल्या मतदान करण्याची सोय करण्यात आली होती. मात्र नगरपालिका, महापालिकेप्रमाणे जिल्हा परिषद निवडणुकीसाठी मतदारांना ही सुविधा उपलब्ध केलेली नाही. यामुळे कोल्हापूर जिल्ह्यात नव्वदी पार केलेल्या इतकेच नव्हे तर काही तर शतक ओलांडलेल्या वयोवृद्धांना तंगडेतोड करीत मतदान केंद्रांचे उंबरठे झिजवावे लागले. प्रशासनाने मात्र उसने अवसान आणून आशा वयस्करांचे मतदान केंद्रावर स्वागत घडवून आणून मतदान वाढत असल्याचे गोजिरवाणे चित्र उभे केले.

मतदान गावगाड्यातील असो की दिल्लीची सत्ता आणणारे. त्याचे एक वेगळेच महत्त्व आहे. निवडणूक काळात प्रशासनाकडून तर मतदान म्हणजे पवित्र कर्तव्य अशी भाषा नागरिकांना ऐकवत मतदारांनी मताधिकार जरूर बजावावा, असे आवाहन केले जाते. प्रत्यक्षात लोकसभा, विधानसभा वेळची मतदारांना दिली जाणारी सुविधा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवेळच्या सुविधा यामध्ये आपपरभाव करण्यात आला आहे.

विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना मतदानाचे प्रमाण वाढण्यासाठी ८५ वर्षांवरील वृद्धांना थेट घरातून मतदान करण्याची विशेष सोय प्रत्येक जिल्ह्यांमध्ये प्रशासनाकडून करण्यात आलेली होती. याचा लाभ अनेक वयोवृद्धांना झाला होता. त्यातून मतदानाची टक्केवारी काही अंशी वाढली होती.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत शासनाला आपल्या याच मतदारांच्या मदत कार्याचा विसर पडला आहे. नगरपालिका, महानगरपालिका आणि पाठोपाठ होत असलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकी वेळी ८५ वर्षांवरील वयस्कांना घरबसल्या मतदानाची सोय पुरवण्यात आलेली नाही. परिणामी काठी टेकत टेकत, कोणाचा तरी आधार घेत, रिक्षातून अनेक महातारवृद्धांना मतदान केंद्रापर्यंत जाण्याचे कष्ट घ्यावे लागले. गाठे थकली असतानाही या वृद्ध मतदारांनी तरुणांना लाजवेल अशा उत्साहाने केलेले मतदान स्तुत्य ठरले. तथापि ज्येष्ठ मतदारांना केंद्रपर्यंत आणण्याची कसलीही जबाबदारी पार न पाडणारे केंद्रातील शासकीय अधिकारी त्यांचे फूल टेऊन स्वागत करीत होते. त्यातून लोकांसोबत मतदान वाढत असल्याचे आपले चित्र निर्माण करण्यास प्रशासन विसरले नाही.

फॉर्म क्र.-३ [पहा नियम- १३ (१) (अ)]

ऋण वसुली न्यायाधिकरण, औरंगाबाद

तळ मजला, 'जिवन सुमन', बिल्डींग, प्लॉट क्र. ३, एन-५, सिडको, औरंगाबाद-४३१००३

शाखा क्र.: OA/2478/2025 नि.क्र. 13

ऋण वसुली न्यायाधिकरण (प्रक्रिया) नियमावली, १९९३ चे नियम ५,
चे उप-नियम (२ब) सह वाचण्यात येणारे कायद्याचे कलम १९ चे उपकलम (४) अंतर्गत समन्स

बँक ऑफ इंडिया
विरुध्द
महेश संतोष गेलार

प्रति
■ (३) बाळासाहेब हरिभाऊ लगड
पोस्ट - वडाळी, तालुका श्रीगोंदा, आरमवनगर, महाराष्ट्र-४१३७२८

समन्स

ज्या अर्थी OA/४४८/२०२५ नामदार पिठासीन अधिकारी / निबंधक यांचे समोर दि.१३/१०/२०२५ रोजी सूचीबद्ध केले होते.

ज्याअर्थी, नामदार न्यायाधिकरणाने कृपायंत होऊन रू. २७५८६५८.६५/- कर्जाच्या वसुलीसाठी तुमच्या विरूद्ध दाखल केलेल्या कायद्याचे कलम १९(४) अंतर्गत सदर अर्जावर (ओ.ए.) समन्स / सूचना जारी केली.

कायद्याचे कलम १९ च्या पोट-कलम (४) नुसार, तुम्हा प्रतिवादींना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

I) समन्स बजावल्यापासून **तीस** दिवसांच्या आत कारणे दाखविण्यासाठी विनंती करण्यात आली ती का देण्यात येऊ नये,

II) मूळ अर्जाच्या अनु.क्र. ३A अंतर्गत अर्जदारांनी विनिर्दिष्ट केलेल्या मालमत्ता आणि मत्तांव्यतिरिक्त अन्य मालमत्ता आणि मत्तांचे तपशील जाहीर करणे.

III) मिळकतींच्या जप्तीसाठीच्या अर्जावरील सुनावणी आणि निकाल प्रलंबीत असल्याने मूळ अर्जाच्या अनु. क्र. 3 A अंतर्गत जाहीर केलेल्या अशा अन्य मत्ता आणि मिळकतींच्या तारण मत्तांच्या व्यवहार करण्यास किंवा त्या निकाली काढण्यास तुम्हाला प्रतिबंधीत करण्यात आले आहे.

IV) तुम्ही न्यायाधिकरणाची पूर्व परवानगी घेतल्याखेरीज ज्यावर तारण हितसंबंधी बनवले आहे त्या कोणत्याही मत्तांची आणि/किंवा मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक 3 A अंतर्गत जाहीर किंवा विनिर्दिष्ट केलेल्या अन्य मत्ता आणि मिळकतींचे त्यांच्या व्यवसायाच्या सामान्य कामकाजाव्यतिरिक्त विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य प्रकारे हस्तांतरण करणार नाहीत.

V)व्यवसायाच्या नियमित कामकाजाच्या ओघांत तारण मत्ता किंवा अन्य मत्ता व मिळकती यांच्या विक्रीतून रोकड झालेल्या विक्री रक्कमेचा हिशोब देण्यात तुम्ही बांधील असाल व अशी विक्री रक्कम अशा मत्तांवर तारण हितसंबंध धारण करणाऱ्या बँक किंवा वित्तीय संस्थेकडे ठेवलेल्या खात्यामध्ये जमा केली पाहिजे.

तुम्हाला **दि.२३/०३/२०२६** रोजी सकाळी **१०.३०** वा. लेखी निवेदन सादर करून त्याची एक प्रत अर्जदारांना सादर करण्याचे व **पिठासीन अधिकारी** यांचे समोर हजर राहण्याचे देखील निर्देश देण्यात येत आहेत, कसूर केल्यास, तुमच्या गैरहजेरीत अर्जावर सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

दि. १४/१०/२०२५ रोजी
हाताने आणि न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने देण्यात आले
(स्वॅप मशीनवर, तसलाच पडताळा मुळ इंडाळी शाहा)

समन्स जारी करण्यासाठी अधिकृत अधिकारी यांची स्वाक्षरी
स्वाक्षरी /-
रजिस्ट्रार
ऋण वसुली न्यायाधिकरण औरंगाबाद

फॉर्म क्र.-३ [पहा नियम- १३ (१) (अ)]

ऋण वसुली न्यायाधिकरण, औरंगाबाद

तळ मजला, 'जिवन सुमन', बिल्डींग, प्लॉट क्र. ३, एन-५, सिडको, औरंगाबाद-४३१००३

शाखा क्र.: OA/640/2025 नि.क्र. 10

ऋण वसुली न्यायाधिकरण (प्रक्रिया) नियमावली, १९९३ चे नियम ५,
चे उप-नियम (२ब) सह वाचण्यात येणारे कायद्याचे कलम १९ चे उपकलम (४) अंतर्गत समन्स

बँक ऑफ इंडिया
विरुध्द
वत्तात्रय कारभारी लांडगे

प्रति
■ (१) वत्तात्रय कारभारी लांडगे
पोस्ट साकुरी, तालुका राहाता, अहमदनगर, महाराष्ट्र-४२३१०९
■ (२) संतोष भानुदास बावके
पोस्ट साकुरी, तालुका राहाता, अहमदनगर, महाराष्ट्र-४२३१०९

समन्स

ज्या अर्थी OA/६४०/२०२५ नामदार पिठासीन अधिकारी / निबंधक यांचे समोर दि.०५/०१/२०२६ रोजी सूचीबद्ध केले होते,

ज्याअर्थी, नामदार न्यायाधिकरणाने कृपायंत होऊन रू. २६१६९९०.०५ कर्जाच्या वसुलीसाठी तुमच्या विरूद्ध दाखल केलेल्या कायद्याचे कलम १९(४) अंतर्गत सदर अर्जावर (ओ.ए.) समन्स / सूचना जारी केली.

कायद्याचे कलम १९ च्या पोट-कलम (४) नुसार, तुम्हा प्रतिवादींना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

I) समन्स बजावल्यापासून **तीस** दिवसांच्या आत कारणे दाखविण्यासाठी विनंती करण्यात आली ती का देण्यात येऊ नये,

II) मूळ अर्जाच्या अनु.क्र. ३A अंतर्गत अर्जदारांनी विनिर्दिष्ट केलेल्या मालमत्ता आणि मत्तांव्यतिरिक्त अन्य मालमत्ता आणि मत्तांचे तपशील जाहीर करणे.

III) मिळकतींच्या जप्तीसाठीच्या अर्जावरील सुनावणी आणि निकाल प्रलंबीत असल्याने मूळ अर्जाच्या अनु. क्र. 3 A अंतर्गत जाहीर केलेल्या अशा अन्य मत्ता आणि मिळकतींच्या तारण मत्तांच्या व्यवहार करण्यास किंवा त्या निकाली काढण्यास तुम्हाला प्रतिबंधीत करण्यात आले आहे.

IV) तुम्ही न्यायाधिकरणाची पूर्व परवानगी घेतल्याखेरीज ज्यावर तारण हितसंबंधी बनवले आहे त्या कोणत्याही मत्तांची आणि/किंवा मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक 3 A अंतर्गत जाहीर किंवा विनिर्दिष्ट केलेल्या अन्य मत्ता आणि मिळकतींचे त्यांच्या व्यवसायाच्या सामान्य कामकाजाव्यतिरिक्त विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य प्रकारे हस्तांतरण करणार नाहीत.

V)व्यवसायाच्या नियमित कामकाजाच्या ओघांत तारण मत्ता किंवा अन्य मत्ता व मिळकती यांच्या विक्रीतून रोकड झालेल्या विक्री रक्कमेचा हिशोब देण्यात तुम्ही बांधील असाल व अशी विक्री रक्कम अशा मत्तांवर तारण हितसंबंध धारण करणाऱ्या बँक किंवा वित्तीय संस्थेकडे ठेवलेल्या खात्यामध्ये जमा केली पाहिजे.

तुम्हाला **दि.२३/०३/२०२६** रोजी सकाळी **१०.३०** वा. लेखी निवेदन सादर करून त्याची एक प्रत अर्जदारांना सादर करण्याचे व **पिठासीन अधिकारी** यांचे समोर हजर राहण्याचे देखील निर्देश देण्यात येत आहेत, कसूर केल्यास, तुमच्या गैरहजेरीत अर्जावर सुनावणी होऊन निकाल दिला जाईल. पेघर पुस्तकासाठी खालीलप्रमाणे करा.

दि. १४/०१/२०२६ रोजी
हाताने आणि न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने देण्यात आले
(स्वॅप मशीनवर, तसलाच पडताळा मुळ इंडाळी शाहा)

समन्स जारी करण्यासाठी अधिकृत अधिकारी यांची स्वाक्षरी
स्वाक्षरी /-
रजिस्ट्रार
ऋण वसुली न्यायाधिकरण औरंगाबाद

सेन्ट्रल बैंक ऑफ़ इंडिया
Central Bank of India
1911 से आपके लिए "केंद्रित" "CENTRAL" TO YOU SINCE 1911

विक्री सूचना

क्षेत्रीय कार्यालय - पहिला मजला, ओबेरॉय मालपानी टॉवर, शासकीय दुध डेअरी समोर, जालना रोड, छ. संभाजीनगर

स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी सूचना किंवा ई-लिलाव सूचना

सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम २००२ च्या नियम ८ (६) च्या तरतुदीसह आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि रिकन्स्ट्रक्शन अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट एंक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना. याव्दारे सामान्यतः जनतेसाठी आणि विशेषतः कर्जदार आणि जामीनदार यांना सूचना देण्यात येत आहे की खाली वर्णन केलेली गहाण असलेली स्थावर मालमत्ता ज्याचा भौतिक / प्रतिकात्मक ताबा सेंट्रल बँकेच्या अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे. सदर मालमत्तेची विक्री **"जसे आहे तसे", "जिथे आहे तिथे" व "जशी आहे" त्या स्थितीत** ऑनलाईन वेबपोर्टल https://ebikray.in (PSB Alliance Pvt. Ltd.) आणि https://www.baanknet.com **दरांकि २७.०२.२०२६ रोजी,** या तत्तावर कर्जदार/ गहाणदार / हमीदार यांचेकडून देय रक्कम वसूल करण्याकरीता, सेंट्रल बँक ऑफ, सेक्युअर्ड क्रेडीटर, यांचेव्दारे करण्यात येणार आहे. राखीव किंमत व अनामत रक्कम व स्थावर मिळकतीचे किमान वर्णन व त्यावर असलेला बोजा यांची माहिती खालीलप्रमाणे विक्रीचा तपशीलवार अटी व शर्तीसाठी, कृपया www.centralbankofindia.co.in वेबसाईटवर दिलेल्या लिंकचा संदर्भ घ्यावा

स्थावर मालमत्तेचे वर्णन

विक्रीचा लॉट क्र.	शाखेचे / कर्जदाराचे / जमीनदाराचे नाव आणि ताबा प्रकार	थकित रक्कम	मालमत्तेचे विवरण	राखीव रक्कम	बयाणा रक्कम ठेव	किमान बोली वाढ ज्याव्हारे बोली लावणी जाणार
१	**कर्जदार - मे. मेगोन होलिअरी** **प्रोप्रा. श्री. इंग्माईल माजिद मेगोन** बर्वत अपार्टमेंट, वार्ड नं.०१, श्रीरामपुर, ता. श्रीरामपुर, जि. अहमदनगर- ४१३ ७०९ **कर्जदार आणि तारणदार -** **श्री. इंग्माईल माजिद मेगोन प्रोप्रा. मे. मेगोन होलिअरी** बर्वत अपार्टमेंट, वार्ड नं.०१, श्रीरामपुर, ता. श्रीरामपुर, जि. अहमदनगर- ४१३ ७०९ **जामीनदार - श्री. माजिद अलि मोहम्मद मेगोन** बर्वत अपार्टमेंट, वार्ड नं.०१, श्रीरामपुर, ता. श्रीरामपुर, जि. अहमदनगर- ४१३ ७०९ शाखा - **श्रीरामपुर** संपर्क - ९८२५७१९१११ (**सांकेतिक ताबा**)	रु **9,80,731.00** (**रुपये नव लाख ऐंशी हजार सातशे एकतीस फक्त**) अधिक व्याज , विमा आणि खर्च	**कार्यालयीन मालमत्ता मालकी हक्क श्री इंग्माईल माजिद** मेगोन, शॉप नं.५, बिल्डींग बर्वत अपार्टमेंट, सर्व्हे नं. ३७ भाग, सिटीएस नं. १८२२ भाग, क्षेत्रफळ एरिया ११.३८ स्क्वे.मी., कवेरी रोड, वार्ड नं.१, श्रीरामपुर, श्रीरामपुर म्युनिसिपल हद्दीत, जि. अहमदनगर **चतुर्सिमा - उत्तर** - सामाईक रस्ता, **दक्षिण** - पार्किंग आणि दुकानासाठी असलेली मोकळी जागा, **पूर्व** - सामाईक जिना, **पश्चिम** - श्री. बाबा मोने दुकान	रु. **4,05,000.00/-** (**रुपये चार लाख पाच हजार फक्त**)	रु. **40,500.00**	रु. **10,000.00** (रुपये दहा हजार)
२.	**कर्जदार: श्रीमती गायत्री प्रकाश खरे** **प्रकाश मनोहर खरे यांची पत्नी** गोकुळ नगर, कोपरगाव, जि. अहमदनगर-४२३६०१ **सह-कर्जदार : श्री. प्रकाश मनोहर खरे** गोकुळ नगर, कोपरगाव, जि. अहमदनगर- ४२३६०१ **जामीनदार - श्री. योजीराव माधव शेळ,** **मयत माधव तात्याचा दहे यांचा मुलगा,** हनुमान मंदिर, दौंच बु., कोपरगाव, जि. अहमदनगर **शाखा - कोपरगाव** **संपर्क - ९८२२७९९१११** (**प्रत्यक्ष ताबा**)	रु. **20,54576/-** (**रु. वीस लाख चौपन हजार पाचशे सहाशत**) तसेच पुढील व्याज खर्च आणि खर्च	रहिवाशी मालमत्ता मालकी हक्क सामाईकपणे श्रीमती गायत्री प्रकाश खरे आणि श्री. प्रकाश मनोहर खरे, प्लॉट नं.१, बांधीव क्षेत्र ७४.३४ स्क्वे.मी. (८०० स्क्वे.फुट) तळ मजला, श्री कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.१ए, क्षेत्रफळ २०७.९९ स्क्वे.मी., ता. कोपरगाव, जि. अहमदनगर, एकूण क्षेत्र २०७.१९ सफुन १०३.५९ स्क्वे.मी., सर्व्हे नं. ३२०/८, गोकुळ नागरी कॉमन सहवासी कॉलनी, मीजे, कोपरगाव, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर - ४२३ ६०१. **चतुर्सिमा - पूर्व** - गाळा मिळकत, **पश्चिम** - प्लॉट नं.२, **दक्षिण** - रस्ता, **उत्तर** - प्लॉट नं.१ ची	रु. **30,21,000/-** (**रुपये तीस लाख एकवीस हजार**)	रु. **3,02,100/-**	रु. 10,000 (रुपये दहा हजार)
३.	**कर्जदार -** **श्रीमती रमा रावेश मनवंदा** विश्वनदिप बिल्डींग, रुम नं.१८, तिसरा मजला, दिल्ली- ११००१ **२. श्री. राकेश कुमार मनवंदा** डब्ल्यूझेड २५, रामनगर एक्सटेंशन टिळकनगर, न्यू दिल्ली - ४४००१४ **३. श्री. ओ.पी. पुष्णी** आर-७/२, उत्तमनगर, दिल्ली-५९ शाखा - **शिर्डी** संपर्क - ९८२५७१९१११ (**प्रत्यक्ष ताबा**)	रु **6,52,037/-** (**रुपये सहा लाख बावन हजार सदतीस रुपये फक्त**) अधिक व्याज , विमा आणि खर्च	मालमत्ता तिरियेत नं. ५३६८/२०१०, दिनांक २९/१२/२०१० **मालमत्ता रहिवाशी घर मालकी हक्क श्रीमती रमा राकेश मनवंदा आणि राकेश कुमार मनवंदा**, मालमत्ता निम्नगा कोंडवडे गाव, गट नं. ७४२३, सर्व्हे सरव्हे हिस्सा, बी-लॉक, फ्लॅट नं. २०८, दुसरा मजला, निम्नगा बी'लाडे, ता. राहता, जि. अहमदनगर. क्षेत्रफळ ५२५ स्क्वे.फुट **चतुर्सिमा - पूर्व** - नगर मनमाड रस्ता, **दक्षिण** - सरकार हॉस्पिटल कोपरगाव, **पश्चिम**- कोंडीहोर, **उत्तर** - फ्लॅट नं. बी-२०७	रु. **7,58,000/-** (**रुपये सात लाख अठ्ठावन हजार फक्त**)	रु. **75,800.00**	रु. **10,000.00** (रुपये दहा हजार)
४.	**कर्जदार -** **श्री. शेखर पांडुरंग अहेर** फ्लॅट नं. ३०२, जिजाऊ रेसिडेन्सी, सर्व्हे नं. ५३, टिपी स्किम नं. ४ पी, फायनल प्लॉट नं. ६० आणि ६१, सब प्लॉट नं. १०, वार्ड नं.७, पुर्नवाद नगर, श्रीरामपुर, जि. अहमदनगर- ४१३ ७०९ **२. श्रीमती पुजा शेखर अहेर** फ्लॅट नं. ३०२, जिजाऊ रेसिडेन्सी, सर्व्हे नं. ५३, टिपी स्किम नं. ४ पी, फायनल प्लॉट नं. ६० आणि ६१, सब प्लॉट नं. १०, वार्ड नं.७, पुर्नवाद नगर, श्रीरामपुर, जि. अहमदनगर- ४१३ ७०९ शाखा - उक्कलगाव संपर्क - ९८२५७१९१११ (**प्रत्यक्ष ताबा**)	रु **26,35,613.00/-** (**रुपये सव्वीस लाख पस्तीस हजार सहाशे तेरा फक्त**) अधिक व्याज , विमा आणि खर्च	रहिवाशी घर मालकी हक्क श्री. शेखर पांडुरंग अहेर आणि श्रीमती पुजा शेखर अहेर, फ्लॅट नं. ३०२, जिजाऊ रेसिडेन्सी, बांधीव क्षेत्र ७८.८१ स्क्वे.मी., अपार्टमेंट एरिया ३२.८८ स्क्वे.मी., एकूण क्षेत्रफळ ९७.२१ स्क्वे.मी., सर्व्हे नं. ५३, टीपी स्किम नं. ४पी, फायनल प्लॉट नं. ६० आणि ६१, सब प्लॉट नं. १०, वार्ड नं. ७, पुर्नवाद नगर, ता. श्रीरामपुर, जि. अहमदनगर. **चतुर्सिमा -** **पूर्व** - अंबादास कारभारी लवाडे यांची मिळकत, **पश्चिम** - ६० फुट रोड, **दक्षिण** - प्लॉट नं. ३०१ आणि विना **उत्तर** - ३० फुट रस्ता	रु. **28,30,000,00** (**रुपये अठ्ठावीस लाख तीस हजार फक्त**)	रु. **2,83,000**	रु. **10,000.00** (रुपये दहा हजार)
५.	**कर्जदार - श्री. गोमाजी सुकदेव कुदळे** सर्व्हे नंबर ११९/१/४, प्लॉट नं. ४, माधव नगर, त्रिजलाल नगर, कोपरगाव, जि. अहमदनगर - ४२३ ६०१ **सह-कर्जदार -** **सौ. कांताबाई गोमाजी कुदळे** सर्व्हे नंबर ११९/१/४, प्लॉट नं. ४, माधव नगर, त्रिजलाल नगर, कोपरगाव, जि. अहमदनगर - ४२३ ६०१ **जामीनदार** **१. श्री. गणेश एकनाथ कुदळे** सहयाद्री कॉलनी, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर- ४२३६०१ **२. श्री. मनोज काशिनाथ कुदळे** सहयाद्री कॉलनी, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर- ४२३६०१ **शाखा - कोपरगाव** **संपर्क - ९८२२७९९१११** (**सांकेतिक ताबा**)	रु. **37,12,443/-** (रुपये सदतीस लाख बारा हजार चारशे त्रेचाळी फक्त) अधिक व्याज , विमा आणि खर्च	**श्री. गोमाजी सुकदेव कुदळे यांच्या मालकीची निवासी मालमत्ता**, सर्व्हे क्रमांक ११९/१/४, अंतिम भूखंड क्रमांक ४, माधव नगर, त्रिजलाल नगर जवळ, कोपरगाव, तालुका कोपरगाव आणि जिल्हा अहमदनगर. क्षेत्रफळ - १३५.०० चौ.मी. शहर/गाव आणि नोंदणी जिल्हा अहमदनगर **चतुर्सिमा -** **पूर्व** - ९ मी. रस्ता **पश्चिम** - अमिनिटी प्लॉट **उत्तर** - भूखंड क्रमांक ३ **दक्षिण** - भूखंड क्रमांक ५	रु. **66,000,00,0 /- सहासष्ट लाख रुपये)**	रु. **6,60,000/-**	रु.10,000.00